**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे — ४**
**जुलै—ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी)**
**पुरवणी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने विलंब शुल्काने सादर करावयाच्या तारखांना मुदतवाढ देणेबाबत**

**प्रकटन**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जुलै—ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२वी) परीक्षेस पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे) Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने विलंब शुल्काने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे —

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्य. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ठ न झालेले), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणारे, ITI विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| विलंब शुल्क मुदतवाढ | गुरुवार, दिनांक १५/०६/२०२३ ते रविवार, दिनांक १८/०६/२०२३ | गुरुवार, दि. ०१/०६/२०२३ पासून सुरु असून सोमवार, दि. १९/०६/२०२३ पर्यंत | मंगळवार दि.२०/०६/२०२३ |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी जुलै—ऑगस्ट २०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षेची आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फतच भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रु—मार्च २०२३ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.
२. श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु—मार्च २०२३ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जुलै—ऑगस्ट २०२३ व फेब्रुवारी—मार्च २०२४ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.
३. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी निर्धारित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
४. आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

दिनांक —१२/०६/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे — ४.

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 578.
दिनांक :- १२/०६/२०२३

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा/ सांगली / कोल्हापूर.

विषय :- जुलै-ऑगस्ट 2023 मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने विलंब शुल्काने सादर करावयाच्या तारखांना मुदतवाढ देणेबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने जुलै-ऑगस्ट 2023 मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने विलंब शुल्काने सादर करावयाच्या तारखांना मुदतवाढ देणेत आलेली आहे. तरी याबाबत आपले कडून उचित कार्यवाही करावी. कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियाच्या (Bank Of India) Virtual Account व्दारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच **जिल्हा वितरण केंद्रावर** सादर कराव्यात.

**(दत्तात्रय शंकर पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**